गुरूवार दि.१८ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# विरोधकांकडून संविधान बदलण्याची अफवा पसरविण्याचे काम-आठवले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | अण्णासाहेब साबळे**

देशाचे संविधान बदलण्याचा अधिकार कोणालाच नाही,परंतु निवडणूकीच्या तोंडावर विरोधकांकडून भाजप पुन्हा सत्तेत आल्यास संविधान बदलले जाईल अशा प्रकारच्या अफ़वा पसरवून जनतेत गैरसमज निर्माण करण्याचे काम केले जात आहे. उलट नरेंद्र मोदी यांनी सत्तेत आल्यापासून '२६ नोव्हेंबर' हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात करून संविधानाचा सन्मान वाढविण्याचे काम केले असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.
आता राजकारणात नीतिमत्ता राहिली नाही.पूर्वी नैतिक राजकारण केले जात असे.राजकारणात विरोधकांचा ही सन्मान केला जायचा.आता होतो तशी एकमेकांवर चिखलफेक होत नव्हती.टीकेला उत्तर देताना नैतिकतेची मर्यादा सांभाळली जात होती.आमच्या कडे खूप शिव्यांचा साठा आहे पण आम्ही राजकारणात संयम ठेऊन विरोधकांना उत्तर देतो.अलीकडे मात्र एकमेकांना शिव्या देण्याचे प्रमाण वाढले आहे.संयम मनाचा मोठेपणा ठेऊन विरोधकांचा ही आदर राखण्याची नैतिकता आता राजकारणात दिसत नाही अशी खंत ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केली.
मंगळवारी,मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित वार्तालाप कार्यक्रमात आठवले बोलत होते. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, उपाध्यक्ष महेश पवार तसेच सर्व पत्रकार सदस्य उपस्थित होते.संविधान बदलण्यासाठीच भाजपकडून ४०० पारचा नारा दिला जात आहे,या विरोधकांच्या आरोपावर पत्रकारांशी बोलताना आठवले म्हणाले,काँग्रेस आणि इंडिया आघाडीकडून निवडणूकीत मते मिळविण्यासाठी अफ़वा पसरविल्या जात आहेत. परंतु आता अफवा पसरवून आणि समाजात फूट पाडून मते मिळविण्याचे काँग्रेसचे दिवस गेले आहेत.नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यापासून संविधानाचा सन्मान वाढविण्याचे काम केले आहे. नरेंद्र मोदी यांनी देशात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभे करण्याच्या दृष्टीने काम सुरु केले आहे, येत्या दिड वर्षात या स्मारकाचे काम पूर्ण होईल.बाबासाहेबांचे लंडनमधील




घर खरेदी करून त्याचे संग्रहालयात रूपांतर करण्याच्या दृष्टीने सुद्धा सरकार प्रयत्न करत आहे.विरोधकांकडून मात्र राजकीय हेतूने मोदी सरकारवर खोटे आरोप केले जात असल्याचे आठवले म्हणाले.तसेच यावेळी देशात पुन्हा सत्ता मिळवत नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होतील असा विश्वासही आठवले यांनी व्यक्त केला.
२०१२ साली बांद्रा येथे रहायला गेलो तेंव्हा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी त्यांना शेजारी नात्याने भेटायला गेलो होतो. तेंव्हा बाळासाहेबांनी आपल्याशी दिड तास चर्चा करत शिवशक्ती -भीमशक्ती एकत्र येण्याची मला साध घातली होती.तेंव्हा विचारधारा वेगळी असली तरी काही किमानसमान कार्यक्रमाचे मुद्दे ठरवून आपण बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे शिवसेना-भाजप युती सोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. तसेच आरपीआय जेंव्हा शिवसेना-भाजप युती सोबत आली.तेंव्हा पासून युतीची महायुती झाली असल्याचे यावेळी आठवले यांनी सांगितले.महायुतीच्या जागावाटपात आरपीआय पक्षाला एकही जागा मिळालेली नाहीत त्यामुळे आरपीआय सध्या बॅकफूटवर गेली आहे.मागून आलेला राष्ट्रवादी सारखा पक्ष जागावाटपात पुढे गेला. मझ्या सारख्या राष्ट्रीय नेत्याला एक लोकसभेची जागा दिली जात नाही हा माझ्या वर अन्याय आहे .परंतु नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान करण्यासाठी आपण चार पाऊले मागे घेत राज्यात महायुती आणि केंद्रात एनडीए आघाडीला साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.सध्या महायुती अडचणीत असल्याने या कठीण काळात आपण महायुतीसोबत प्रामाणिक राहणार असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले.मंडल आयोगाच्या शिफारशी प्रमाणे मराठा समाजातील गरीब मराठ्यांना आरक्षण मिळाले पाहिजे ही मागणी सर्व प्रथम आरपीआयने केली होती असा दावा रामदास आठवले यांनी यावेळी केला.तसेच तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवून ओबीसी वर्गाचे सध्याचे २७ टक्के आरक्षण कायम ठेवून दुसरा ओबीसी प्रवर्ग तयार करून त्यात मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे,असे आठवले म्हणाले.

## न विसरता करा हो मतदान
# सत्यशोधक चित्रपटानंतर मतदान जनजागृती साठी स्वरचित गीतामध्ये प्रा.संजय खडसे यांची भूमिका

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

बुलढाणा जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. यंदाच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी. सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यांनी सिंदखेड राजा उपविभागांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आतापर्यंत विविध उपक्रम राबवले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून मतदार जनजागृतीसाठी स्वतः आपल्या आवाजात त्यांनी गीत तयार करून एक वेगळा उपक्रम राबविला



आहे. त्या अनुषंगाने प्राध्यापक खडसे यांनी गायन करून मतदान जनजागृती केली. या गीताच्या सीडीचे प्रकाशन लवकरच होणार आहे हा मतदान जनजागृती साठी खूप लाभदायक ठरणार उपक्रम असून हा लोकशाहीचा उत्सव आहे या उत्सवात प्रत्येक मतदाराने मतदान करून आपला सहभाग नोंदवावा यासाठी या गीताच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. सिंदखेड राजा विधानसभा क्षेत्राचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या पत्नी नीता संजय खडसे, सोबत गीताची निर्मिती केली आहे. न विसरता करा हो मतदान...... हे गीत असून पारंपारिक चालीवर असलेल्या या गीताचे लेखन, गायन दोन्ही सोबत राहून सादर केले. या अगोदर सुद्धा अशी गीत अकोला येथे निवासी उपजिल्हाधिकारी असताना त्यांनी कोरोना काळात गीत सादरीकरण केलेले आहे. व तसेच नुकताच प्रदेशीत झालेला सत्यशोधक मराठी चित्रपटा मध्ये प्रा .संजय खडसे व त्यांच्या पत्नी निता खडसे यांनी भूमिका साकारलेली आहे.


# चिखली वरून निघालेल्या स्कॉर्पिओ गाडीचा भीषण अपघात ४ ठार तर ५ जखमी

### जालना येथे नवरीला हळद लावण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाचा घाला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

तालुक्यातील दगडवाडी फाट्या नजिक चिखली वरून जालना कडे निघालेल्या एका स्कॉर्पिओ गाडीचा रत्यावरील दुभाजकाला धडकून भीषण अपघात झाला. अपघात दरम्यान गाडी पलटी होऊन गाडी मधील ३ प्रवाशांचा जागीच मृत्यु झाला व गाडीच्या चालकाचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला असून ५ जणे जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे.
अंबाशी ता. चिखली येथील देशमुख कुटुंब उद्या (दि. १८) रोजी लग्न असल्यामुळे आज नवरीला हळद



लावण्यासाठी २ वाहने चिखली वरून जालना येथे जाण्यासाठी निघाली असता देऊळगाव मही ते देऊळगाव राजा मधील दगडवाडी फाटा येथे गाडी क्रमांक एम एच २८ बी क्यू ०६०६ या गाडीच्या चालकाचा ताबा सुटून सदरील वाहन दगडवाडी फाट्या जवळील दुभाजकाला धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात विलास जयवंतराव देशमुख वय ६३,अशोक भीमराव नयाके रा.सवना वाशीम वय ६५,वसंत देविदास देशमुख. वय ४३ रा.अमानी वाशीम हे जागीच ठार झाले. तर वाहन चालक योगेश लक्ष्मण देशमुख यास छातीत जबर मार लागला व फुफुसात रक्तस्त्राव झाल्याने जालना येथे हलविण्यात आले.मात्र उपचारापूर्वीच त्याची प्राणज्योत मालवली. या भीषण अपघातात मीरा संजय देशमुख, शालिनी अनंता देशमुख, अक्षदा संदीप देशमुख, गोपाळ देशमुख, गजानन आसाराम तौर जखमी झाले. अपघात ग्रस्त वाहनात एकूण ११ जण होते तर मागील वाहनात नवरदेवा सह देशमुख कुटुंबातील व्यक्ती होते. मृतकात दोन जण पाहुणे असून ते मूळचे अंबाशी येथीलच रहिवासी होते.

# वाकद जाहांगीर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३३ वी जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा**

वाकद जाहांगीर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३३ वी जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. सकाळी ८ वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे ध्वज चाढवण्यात आला कार्यक्रमाला उपस्थिती किनगाव राजा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलिस ठाणेदार विनोद नरवाडे, अविराज सेवाभावी ट्रस्ट चे अध्यक्ष भगवानराव विणकर. उपसरपंच संदीप मेरात ग्रामपंचायत सदस्य हनुमान टेकाळे पोलीस पाटील नितीन घेवांदे अरुण घेवंदे संदीप टेकाळे माधव तळेकर मखमले सर मनोज झगरे रामेश्वर बुरकुल सिद्धार्थ घेवंदे मिलिंद घेवंदे संदीप घेवंदे शैलेंद्र घेवंदे गौतम घेवंदे सुधाकर घेवंदे बद्रीनाथ घेवंदे योगेश घेवंदे प्रवीण घेवंदे दुर्योधन विणकर विलास



विणकर प्रवीण विणकर नागेश घेवंदे दत्तू विणकर सुधीर घेवंदे सचिन घेवंदे कारभारी विणकर सोनल प्रथमेश अमोल प्रसन्ना प्रवीण अमोल घेवंदे माजि सैनिक राजू पवार समाधान पाखरे भीमराव विणकर सतीश घेवंदे गावातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते
सकाळी ध्वजवंदन करून मान्यवरांचे विचार ऐकण्यात आले मलकापूर पांग्रा येथून आलेली बाईक रॅली चे स्वागत करण्यात आले त्रिशरण पंचशील घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात केले संध्याकाळी गावातून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमेची गाडी मध्ये सजावट करून मिरवणूक काढण्यात आली यावेळी गावात हरिनाम सप्ताह सुरू आहे तरी गावातील सर्वधर्म समभावाचे वातावरण कायम ठेवत कार्यक्रमाचे समापन करण्यात आले.

# महावितरणाचा बट्याबोळ चक्क सात दिवसापासून माळसावरगाव अंधारात

### सिंदखेडराजा महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे ठिया आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

तालुक्यातील माळ सावरगाव येथे चक्क गेल्या सात दिवसापासून लाईन नसून गावकरी व शेतकरी त्रस्त आहेत. ता.१७ एप्रिल रोजी रात्री ९. ३० वाजता सिंदखेडराजा महावितरण कार्यालयासमोर गावकऱ्यांनी ठिया आंदोलन सुरू केले आहे.
सध्या प्रचंड उन्हाळा व उष्णतेचे दिवस असल्याकारणाने माळ सावरगाव येथील शेतकरी गेल्या सात दिवसापासून गावात वीज नसल्याकारणाने हैराण असून सतत महावितरण अधिकारी उपकार्यकारी अभियंता हिरालाल जांभुळकर यांच्याशी शेतकऱ्यांनी वारंवार वीज जोडून देण्या



संदर्भात संपर्क केला. मात्र त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. अखेर नाईलाजाने माळसावरगाव गावातील तब्बल १०० गावकऱ्यांनी रात्री सिंदखेड राजा येथे येऊन महावितरण कार्यालयासमोर हे आंदोलन केले व महावितरण अधिकाऱ्यांच्या विरोधात जोरदार घोषणा देण्यास सुरुवात केली.

**माळसावरगावा कडे महावितरणचे जाणुन बुजुन दुर्लक्ष**

आमच्या गावाकडे महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तसेच लाईनमन जानुन बुजून दुर्लक्ष करत असल्याचे सरपंच निवृत्ती कठोरे यांनी सांगितले. आम्हाला डावरगावावरुन लाईन न देता सिंदखेडराजा वरुन वीज पुरवठा जोडून दयावा अशी आमच्या सर्व गावकऱ्यांची मागणी असल्याचे ते म्हणाले.

**झाडे लावा झाडे जगवा**

**चारोळी**

जीवनी येती अनेक रंग
करू नको तू त्याचा बेरंग
जगण्याचा असावा आपुला ढंग
कर नेहमी सज्जनाचा संग.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# श्रीराम नववी व सागर दादा देरकर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | अण्णासाहेब साबळे**

कोयाळ येथील सरपंच तथा युवा नेते सागर दादा देरकर यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच श्री रामनवमी निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपस्थित उध्दव बापू देरकर,धैर्यशिल थोरवे,ऋषिकेश राजाभाऊ देरकर,विजु भाऊ रासकर अनिकेत रासकर,सागर दादा देरकर मित्र मंडळाचे सर्व सहकारी



मित्रांनी सागर दादा देरकर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर घेऊन एक नवा संकल्प हाती घेऊन इतर तरूणांसाठी संदेश दिला. हा अनोखा उपक्रम..मिळेल एखाद्याला जीवदान,केल्यास आपण रक्तदान..! आष्टी तालुक्यातील बुधवार दि.१७ एप्रिल रोजी दिवसभर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मिडिया माध्यमातून सरपंच तथा युवा नेते सागर दादा देरकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव झाला..

# सासरच्या जाचाला कंटाळून तीन महिन्याच्या गरोदर महिलेची आत्महत्या

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिगोली | भगवान जाधव**

वसमत शहरातील पठाण मोहल्यात राहत असलेल्या एका विवाहित महिलेने तीन महिन्याची गरोदर असताना गळफास घेऊन आत्महत्या केली याप्रकरणी आत्महत्यास प्रवर्त केल्याप्रकरणी सासरच्या आरोपीवर शहर पोलीस स्टेशन वसमत येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे सासरच्या मंडळींनी सुनेला आत्महत्तेस प्रवृत्त केल्या मुळे तिने जाचा ला कंटाळून दि १४/४ /०२४ रोजी गळफास घेऊण पोटातल्या गर्भा सह स्वःताची जीवन यात्रा संपवीली . वसमत शहर पोलीस स्टेशन मधे नवरा, सासु ,सासऱ्या गुन्हा दाखल झाला.
या बाबत सविस्तर वृत्त असे की शेख फैसल शेख शौकत हुसेन रा. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार मयत शेख हिना सुलताना शेख जाहेद रा पठाण मोहल्ला हिस तु माहेरून लाख ऑटो घेण्यासाठी दोन लाख रुपये घेऊण ये म्हणुन वारंवार छळ केला जात होता माहेरच्या लोकांनी लेकी च्या सुखी संसारासाठी वेळोवेळी फोन पे द्वारे पैसे पुरवुन ही त्यांची पैस्याची मागणी सतत वाढत गेली. तसेच तुला स्वयंपाक येत नाही , धुने धुता येत नाही , भांडे घास्ता येत नाही असे म्हणुन तिला छळले या शारीरीक , माणसीक जाचा ला कंटाळुन मयत हिना ने तिन महीण्याची गरोदर असताना दि१४ एप्रिल रोजी रात्री १० :३० वा राहत्या घरी गळफास घेऊण आत्महत्या केली. म्हणुन आत्महत्येस प्रवत्त केल्या बदल तिचा नवरा शेख जाहेद शेख अब्दुल बारी , सासु शेख रेहना अब्दुल बारी , सासरा शेख अब्दुल बारी यांच्या वर कलम ३०६ ,४९८ (अ) ३४ भादवी प्रमाणे शहर पोलीस स्टेशन वसमत येथे गुन्हा दाखल करन्यात आला असुन पोलिस निरिक्षक वाघमारे साहेब यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस उप निरिक्षक श्री आरआर. महीपाळे पुढील तपास करत आहेत

संपादकीय

# घोषणांची ‘रेल्वे’ धावणार कधी?

लोकनेता न्यूज नेटवर्क


अंतरिम अर्थसंकल्पाकडून फारशा अपेक्षा केल्या जात नसल्या, तरी विविध पातळ्यांवर अनेक वर्षे चर्चेत असलेल्या पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचे नक्की काय झाले, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. तसेच, पुणे-लोणावळा दरम्यान आणखी दोन मार्गिका वाढण्याचे संकेत मिळत असले, तरी तेदेखील नवीन नाहीत. गेले दोन दशके रेल्वे सेवा आणि विस्तार याबाबत पुणेकर केवळ अशा संकेतांवरच झुलत आहेत.पुणे रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास असो किंवा पुणे-लोणावळा दरम्यान तिसरी व चौथी मार्गिका टाकण्याचे काम असो, आत्तापर्यंत अशा घोषणांचा सुकाळ पुणेकरांनी कायमच अनुभवला आहे. घोषणा आणि प्रत्यक्ष होणारे काम यामध्ये काही कालावधी जाणार, हेसुद्धा सात वर्षांहून अधिक काळ चाललेल्या ‘पुणे मेट्रो’च्या कामावरून अनुभवता येतेच आहे. तरीही, पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी रेल्वे सुविधा किंवा इतर विकासाच्या पायाभूत कामांकडे जवळपास दोन दशकांहून अधिक काळ दुर्लक्षच झाले आहे. देशात रेल्वेसाठी मोठ्या प्रमाणात नव्या मार्गिका आणि अस्तित्वातील मार्गिकांचा विस्तार (म्हणजे दोन मार्गिकांच्या जागेवर तीन, तर तीनच्या ठिकाणी चार) अशी कामे युद्धपातळीवर सुरू असताना, पुणे-लोणावळा दरम्यानच्या आणखी दोन मार्गिकांसाठी नव्या शतकातील जवळपास २५ वर्षे निव्वळ घोषणा आणि पुन्हा घोषणा यातच का जात असावीत?

पुणे-लोणावळा दरम्यानची प्रवासी संख्या वाढत असताना वेळीच तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचा विस्तार झाला असता, तर पुण्यातून पिंपरी-चिंचवड किंवा कामशेत-तळेगावहून निगडी-आकुर्डीत शिकण्यासाठी, नोकरीसाठी येणाऱ्या अनेक सर्वसामान्यांना फायदा झाला असता. या मार्गिका टाकण्याचे काम वेळेत पूर्ण झाले असते, तर मुंबईप्रमाणेच पुणे-लोणावळा दरम्यानच्या सध्याच्या सर्व स्टेशनच्या आजूबाजूचा परिसर विकसित झाला असता. दुर्दैवाने, केवळ घोषणा आणि अर्थसंकल्पात होणारी किरकोळ तरतूद यापुढे या मार्गिकांचा प्राधान्याने विचार करायला हवा, असे ना कोणत्या सरकारला वाटले, ना कोणत्याही रेल्वेमंत्र्याने त्यासाठी पुढाकार घेतल्याचे पाहायला मिळाले, ना गेल्या २४ वर्षांत पुणे आणि परिसराला लाभलेल्या किमान डझनभर खासदारांनी पुणे-लोणावळा मार्गिकेचे काम त्वरेने करावे, यासाठी पाठपुरावा केला. नाही म्हणायला सुरेश प्रभू यांच्या रेल्वेमंत्रिपदाच्या काळात रेल्वे आणि राज्य सरकारने ५०-५० टक्के खर्च उचलून हा प्रकल्प करण्याची चर्चा झाली; परंतु, राज्य सरकार त्याचा भार पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्यावर टाकणार असल्याचे लक्षात येताच, स्थानिक संस्थांमधील वेळोवेळच्या सत्ताधाऱ्यांनी या प्रकल्पात आडकाठी आणली. मुंबईहून दक्षिणेकडे आणि दक्षिणेहून मुंबईकडे जाणाऱ्या बहुतांश प्रवासी आणि मालवाहतूक करणाऱ्या रेल्वे लोणावळा-पुणे याच मार्गाने पुढे जात असल्याने एकूण रेल्वेच्या अस्तित्वातील सुविधांवर येणारा ताण विचारात घेता तरी, हे काम खरेतर यापूर्वीच होणे गरजेचे असताना, त्यासाठी पुन्हा एकदा निवडणूकपूर्व अंतरिम अर्थसंकल्पातील घोषणेपर्यंत थांबावे लागले आहे. नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर किमान ही पुन्हा एकदा फक्त घोषणाच राहू नये, अशी अपेक्षा आहे. पुणे-लोणावळा दरम्यानच्या दोनच मार्गिकांवर अत्यंत प्रवासी आणि मालगाड्यांची वाहतुकीची वर्दळ मोठी असल्याने ‘मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेस’ वगळता एकही नवीन रेल्वे गेल्या दहा वर्षांमध्ये या मार्गावर सुरू झालेली नाही. केंद्र सरकारला आणि रेल्वे मंत्रालयाला हा मार्ग ‘हाय डेन्सिटी’ असल्याचे आत्ता समजले असेल आणि त्यासाठी तिसरी व चौथी मार्गिका टाकण्यात येणार असली, तर त्याचे स्वागतच करायला हवे. फक्त, त्यासाठी पुढील २० वर्षे प्रतीक्षा करायला लागू नये, एवढीच माफक अपेक्षा पुणेकरांना आहे.पुणे रेल्वे स्थानकावरील जागेची अडचण लक्षात घेता, हडपसरला ‘सॅटेलाइट टर्मिनल’ विकसित करण्याची घोषणा अशीच बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. चार-पाच वर्षांमध्ये हे टर्मिनल विकसित करण्यासाठी टप्प्याटप्प्याने निधी मिळत असला, तरी प्रवासी सुविधांच्या दृष्टीने विविध कामांना विशेष गती अद्याप प्राप्त झालेली नाही. सन २०२१मध्ये या टर्मिनलवरून पहिली रेल्वे सुटली. त्यानंतर या स्टेशनवरून आणखी गाड्या सुटणे अपेक्षित असले, तरी अद्याप एकही रेल्वे वाढविण्यात रेल्वे प्रशासनाला यश आलेले नाही. रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी पुरेसा रूंद रस्ता नसल्याने महापालिकेकडे पाठपुरावा करून हा विषय त्वरेने मार्गी लावणे आवश्यक आहे. तसेच, रात्री-अपरात्री प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेऊन येथील जागा बंदिस्त करण्यासाठी पुढाकार घेतला जायला हवा. ‘हडपसर टर्मिनल’चा विकास लवकर झाल्यास पुणे स्टेशनवरील अनेक रेल्वे या ठिकाणाहून पुढे जाऊ शकतात. अनेक मोठ्या शहरांमध्ये तीन-चार वेगवेगळी टर्मिनल असताना पुण्यासारख्या शहरात अजूनही रेल्वे प्रवाशांना पुणे स्टेशनवरच अवलंबून राहावे लागते, यातच आत्तापर्यंतच्या राजकारण्यांची आणि रेल्वेतील अधिकाऱ्यांची ‘दूरदृष्टी’ किती खुजी होती हे दिसून येते. हडपसरबरोबरच खडकी रेल्वे टर्मिनल विकसित करण्यात येणार असल्याचे सांगितले जाते आहे. मात्र, प्रत्यक्ष होणाऱ्या घोषणा आणि त्याची अंमलबजावणी, यासाठी पुण्यात लागणारा कालावधी कधीच कोणाला सांगता येत नाही. ‘डेडलाइन’च्या पुढे एक-दोन वर्षे काम चालणार, हे आता नागरिकांनी गृहीत धरले आहे. मात्र, पुण्यातील रेल्वे प्रकल्पांबाबत काम सुरू होण्याचीच ‘डेडलाइन’ नक्की होत नसल्याने ते पूर्ण होण्यासाठीचा कालावधी तरी कसा निश्चित होणार?पुणे-लोणावळा दरम्यानच्या विस्तारित मार्गिका आणि हडपसर-खडकी टर्मिनलचा विकास या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांसह ‘पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे’ हा प्रकल्प केवळ चर्चा आणि प्रकल्प अहवालासाठी तयार होणारे कागद, यापुढे सरकत नाही, हे दुर्दैवच म्हणायला हवे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन या प्रकल्पाला तत्त्वत: मान्यता मिळाल्याचे सर्व माध्यमांसमोर जाहीर केले होते. त्यानंतर, अंतिम मान्यतेसाठी एक वर्ष उलटून गेले, तरी पुढे काहीच घडलेले नाही. दरम्यानच्या काळात हा प्रकल्प ‘महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ’ (महारेल) यांच्याऐवजी मध्य रेल्वे करणार, अशी चर्चा सुरू झाली आहे. प्रकल्प कोणी करायचा, यापेक्षाही प्रकल्प वेळेत होणे महत्त्वाचे असताना त्यासाठी प्रशासकीय आणि राजकीय इच्छाशक्ती अभावी होणारा विलंब निव्वळ खेदजनक आहे. १६ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पाची किंमत आत्ताच काही पटींनी वाढली असताना, त्यासाठी आता आणखी किती दिवस प्रतीक्षा करायची? पुणे-नाशिक दरम्यानच्या प्रवाशांना आणि मालवाहतुकीसाठी अत्यंत फायदेशीर ठरणाऱ्या आणि रेल्वेमंत्र्यांनी तत्त्वत: मान्यता दिली असतानाही या प्रकल्पाच्या मार्गात आडकाठी आणणारे झारीतील शुक्राचार्य कोण? याचे तरी उत्तर पुणेकरांना देण्याचे धाडस सत्ताधाऱ्यांनी दाखवावे.

# कुणाच्या मेंदूवर कुणाचा ताबा?

लोकनेता न्यूज नेटवर्क

नुकतीच एलॉन मस्क यांनी ‘न्युरालिंक’ या मानवी मेंदूत बसवायच्या चिपबद्दलची घोषणा केली. ‘न्युरालिंक’च्या दाव्यानुसार, या ब्रेनचिपचा उपयोग पार्किन्सन रोग, फेफरे, नैराश्य, मेंदूच्या दुखापती, तीव्र वेदना, अंधत्व आणि बहिरेपणा यासारखे आजार असणाऱ्या रुग्णांसाठी होईल. तथापि, याचे भविष्यात वेगळेच परिणामसुद्धा दिसतील, धोकेही असतील.कल्पना करा, तुम्ही टीव्हीवर बातम्या पाहात बसलाय आणि तुम्हाला चॅनेल बदलायचा आहे. रिमोट तुमच्याजवळ नाही. तुम्ही विचार करताय न करताय तोपर्यंत तुम्हाला पाहिजे तो चॅनेल समोर दिसायला लागला, रिमोटशिवाय. असे शक्य आहे का? एका बैठकीमध्ये किंवा हजारो लोकांसमोर तुम्ही पॉवरपॉईंटवर सादरीकरण करताय. प्रत्येकवेळी स्लाईड पॉईंटरने बदलावी लागते. बोलण्याची लय तुटते. समोरचे लोक चुळबुळ करताहेत.पण आता तसे होणार नाही, तुम्ही विचार करताय तोपर्यंत पॉवरपॉईंटची स्लाईड बदललेली असेल. एवढेच काय तुम्ही विचार करताय तोपर्यंत तुमची मोटार सुरू झालेली असेल. घराचा दरवाजा उघडलेला असेल. हे झाले वस्तूंचे; पण याहीपेक्षा भयानक म्हणजे तुम्ही समोरच्याला न सांगता त्याच्याकडून काम करून घेणार आहात. म्हणजेच दुसऱ्याच्या मानवी मेंदूवरपण तुम्ही नियंत्रण मिळवू शकाल. कदाचित तुमच्या- माझ्या मेंदूवर दुसरा कोणीतरी.हे धोके शास्त्रज्ञ, इतर क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करू लागले आहेत. मागच्या आठवड्यात अमेरिकी उद्योजक एलॉन मस्क यांनी केलेली घोषणा. न्यूरालिंक, ज्या कंपनीद्वारे मस्कने मेंदू-संगणक इंटरफेसमध्ये (इउखी) व्यक्तीमध्ये ‘मेंदू-वाचन’ उपकरण स्थापित केले आहे. कंपनीच्या दाव्यानुसार हे उपकरण गंभीर अर्धांगवायू असलेल्या व्यक्तीला संगणक, रोबोटिक आर्म, व्हिलचेअर किंवा इतर उपकरणांवर केवळ विचार करून नियंत्रण ठेवता यावे, या उद्देशाने तयार केले आहे. त्याच्या प्राण्यांवरील चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. मानवी चाचण्यांची माहिती गुप्त आहे.२०२०-२१मध्ये जग ज्यावेळी कोरोना महासाथीने ठाणबंद होते, तेव्हा शास्त्रज्ञ, विद्यापीठे आणि कंपन्या कोरोना लसीच्या शोधात गुंतले होते. त्यावेळी ‘न्युरालिंक’ मात्र मानवी मेंदूत बसवायची चिप बनवत होती. प्राण्यांवर चाचण्या करत होती. त्यावेळीच त्यांनी याबद्दल घोषणा केली होती. पण जगातील कोट्यवधी लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले.२९ जानेवारी रोजी ज्यावेळी मस्क यांनी स्वतः घोषणा केली तेव्हा जागतिक माध्यमे, शास्त्रज्ञ आणि इतरांचे लक्ष गेले. न्युरालिंक चिपमध्ये ६४ लवचिक पॉलिमर इलेक्ट्रोड्स आहेत, जे



मेंदूमधील एक हजार६४ ठिकाणांहून मेंदूच्या वेगवेगळ्या क्रियांचे रेकॉर्डिंग करणार आहे. ती माहिती त्याच चिपमध्ये साठवली जाईल, तिथेच त्यावर प्रक्रियापण केली जाणार आहे.याच माहितीच्या आधारावर एखादी व्यक्ती तिच्यासमोरची वस्तू नियंत्रित करणार आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर गंभीर अर्धांगवायू झालेला रुग्ण रुग्णशय्येवर असतो, त्याला समोर जे काही चालू आहे ते दिसते, समजतही असते. पण हालचाल करता येत नाही, स्पष्ट बोलता येत नाही.न्युरालिंक चिप बसवल्यानंतर तो व्यक्ती फक्त विचार करणार की, समोरच्या टीव्हीचा चॅनेल बदलला पाहिजे, लगेच तो बदलला जाईल; अपंग व्यक्ती विचार करेल की, माझी व्हिलचेअर माझ्याजवळ आली पाहिजे, लगेचच ती येईल. आता आपल्याला वाटेल यात घाबरण्यासारखे काय आहे, हे तंत्रज्ञान उपयोगीच आहे. मलासुद्धा यामध्ये गैर काहीच वाटत नाही. गेल्या दशकात अनेक शास्त्रज्ञांनी अशी उपकरणे तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.


नेमका धोका काय?

जुलै २०२३मध्ये स्वित्झर्लंडमधील विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी असे उपकरण बनवले की, ज्याने अर्धांगवायू झालेल्या माणसाला फक्त विचार करून चालण्यास सक्षम केले आहे. पण न्युरालिंक चिपचा खरा धोका पुढे आहे. हे उपकरण ब्लूटूथ, किंवा घरातील इंटरनेट वायफायलासुद्धा कनेक्ट करता येणार आहे. भविष्यात ते आपल्या मोबाईल नेटवर्कला पण कनेक्ट करता येईल आणि भीती तीच आहे.कदाचित भविष्यात रुग्णाच्या मेंदूमध्ये बसवलेल्या चिपवर ब्लूटूथ किंवा वायफायवरून दुसरेच कोणीतरी नियंत्रण मिळवेल आणि तोच त्या रुग्णाला इतर गोष्टी करण्यासाठी आज्ञा देईल. शास्त्रज्ञांना भीती वाटते की, ही चिप इतर लोकांच्या हातात सापडली की, मग ते उद्योजक, राजकारणी किंवा दहशतवादी असो; ते सामान्य लोकांच्या मेंदूतही अशी चिप बसवून त्यांच्याकडून पाहिजे ती कामे करवून घेतील.असे काही होणार नाही असे गृहीतही धरू. पण आजच्या घडीलासुद्धा न्युरालिंकचा हा कारनामा वैज्ञानिक नैतिकतेला धरून नाही, असा सरळ सरळ आरोप जगातील हजारो शास्त्रज्ञांनीच नव्हे तर राजकारणी आणि तत्त्वज्ञांनीही केला आहे. २०२२ आणि २०२३ मध्ये काही अहवाल समोर आले ज्यामध्ये कंपनीच्या क्लिनिकल चाचणीमध्ये वापरलेल्या माकडांवर आणि इतर प्राण्यांवर दुर्बल प्रभाव पडला.ज्यात त्याच्या संशोधनाचा एक भाग म्हणून तब्बल बारा माकडांना अधू केल्याचा किंवा मारल्याचा आरोप आहे. कंपनीवर प्राण्यांशी गैरवर्तनाचा आणि दूषित हार्डवेअरद्वारे संसर्गजन्य रोगजनकांच्या मानवी संपर्कास धोका निर्माण केल्याचा आरोप आहे. अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या तक्रारींमध्ये असे आरोप आहेत की, प्राण्यांच्या चाचणीत घाई केली गेली. परिणामी प्राण्यांचा मृत्यू झाला.‘रॉयटर्स’च्या म्हणण्यानुसार, या सर्व प्रकाराची अमेरिकन कृषी विभागाकडून तपासणी करण्यात आली. २०२२मध्ये ‘रॉयटर्स’ने पुनरावलोकन केलेल्या नोंदी दर्शवतात की, कंपनीने २०१८पासून २८० मेंढ्या, डुक्कर आणि माकडांसह दीड हजार प्राणी मारले. एवढेच काय तर शास्त्रज्ञांनी अमेरिकी अन्न व औषध प्रशासन यंत्रणेलासुद्धा (एफडीआय) घाईघाईत मानवी चाचणीस मुभा दिल्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.‘युनेस्को’च्या अहवालानुसार, न्युरोटेक्नॉलॉजी म्हणजेच मानवी मेंदूवर संशोधन करणारी विज्ञानाची शाखा आणि त्यावर आधारित उद्योगधंदे यांची वार्षिक उलाढाल सुमारे ३३ अब्ज डॉलर आहे. न्युरालिंक यात दररोज कोट्यवधी डॉलरची भर घालत आहे. दहा-बारा वर्षात हा उद्योग बलाढ्य उद्योगांना मागे सारून ट्रिलीयन डॉलरचा उद्योग होईल.संयुक्त राष्ट्रांची वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संस्थाने काही दिवसांपूर्वी पॅरिसमध्ये न्युरोटेक्नॉलॉजीचे भविष्यातील फायदे आणि तोटे तसेच त्याचे मानवी सामाजिक वर्तनावरील परिणाम यावर जागतिक परिषद घेतली. यामध्ये जगातील हजारो तत्त्वज्ञानी न्युरोटेक्नॉलॉजीवर जागतिक आचारसंहिता (कोड ऑफ कंडक्ट) तयार करण्याची मागणी केली म्हणजे याचे भविष्यातील दुरुपयोग रोखता येतील.युवाल नोवा हरारी म्हणतात की, भविष्यात, कोणत्याही इतर वस्तूपेक्षा मग ते मोबाईल असो, कार असो किंवा सॉफ्टवेअर असो; मानवी मेंदूवर नियंत्रण ठेवणाऱ्या उत्पादनांना जगात खूप मागणी असेल. २०५०नंतर हाच उद्योग जगातील सर्वात बलाढ्य असेल. कदाचित न्युरालिंकपण हेच ओळखून असेल. आज आपण अनेकदा एखाद्याला सहज बोलून जातो, ‘तुझा मेंदू गहाण ठेवला आहेस का?’ कदाचित भविष्यात हे खरेही होईल!

# मोकळ्या जागांचा घास

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबईतील मोकळ्या जागांचा घास घेण्याची जणू चढाओढच लागलेली असते. पूर्व उपनगरांमध्ये मिठागरांच्या रूपातील शेवटच्या मालुसऱ्याचाही आता धारावीतील अपात्रांच्या पुनर्वसनासाठी बळी दिला जाणार आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प आखला गेल्यानंतर त्यातील एकेक कंगोरे आता बाहेर येत आहेत. धारावीतील अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी मिठागरांची २८३ एकर जागा केंद्र सरकारकडून ९९ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घेण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यातून आता येथील मिठागरांवर काँक्रिटचे जंगल उभारण्याचा राजरस्ता बांधला जाणार आहे.मुलुंड, भांडुप, ऐरोली, कांजुर, ट्रॉम्बे, वडाळा या परिसरात असलेली मिठागरे ही मुंबईसाठी एखाद्या स्पंजसारखी काम करतात. अतिवृष्टीच्या पाण्याचा जोर शोषून घेण्याचे काम ही मिठागरे करतात. सन २००५ मध्ये मिठी नदीच्या क्षेत्रात लाखो जीव प्रलयात अडकले, तेव्हा उर्वरित मुंबईला मिठागरांनी संरक्षक कवच दिले. मुंबईतील ५३०० एकर मिठागर क्षेत्रापैकी १८०० एकर मिठागरांवर किफायतशीर घरांचा प्रकल्प राबविण्यास २०१९ मध्ये तत्कालीन शिवसेना-भाजप सरकारने मंजुरी दिली. मिठागरांच्या जागांना पायाभूत सुविधांसाठी




वेगळा नियम आणि धारावी प्रकल्पासाठी एका सहीच्या फटकाऱ्यात विशेष मर्जी असे कसे असू शकते? धारावी ही केवळ रहिवासी झोपडपट्टी नसून ती कष्टकऱ्यांची उद्योगनगरी आहे. मग तेथील अपात्र कुटुंबेही आपले रोजगाराचे ठिकाण सोडून अन्यत्र बस्तान बसवतील का, हा प्रश्न उरतोच. धारावी प्रकल्प इतकी वर्षे गाजत असताना, तेथील नेमके पात्र किती, अपात्र किती, याचा अधिकृत उलगडा अजून झालेला नाही. सन २००० नंतरच्या अपात्रांनाही अन्यत्र स्वस्त घरांची सुविधा मिळणार, हे मानवतेच्या दृष्टीने योग्य असले, तरी त्यात शहरनियोजनाच्या दृष्टीचा अभाव आहे.

आज मुंबईच्या प्रत्येक उपनगरामध्ये ५०-६० वर्षे जराजर्जर झालेल्या इमारतींचा रडतखडत पुनर्विकास सुरू आहे. तेथील नागरिकांच्या हंगामी पुनर्वसनासाठीही सोयी तोकड्या पडत आहेत. नव्या सदनिकांसह टॉवर उभारल्याखेरीज तेथील करदात्यांचा पुनर्विकास शक्य नाही. अशावेळी एका उपनगराचा भार या दुसऱ्या ठिकाणी टाकल्यास त्यातून धुसफूस, विरोध वाढून प्रकल्पांना विलंब होण्याची शक्यता अधिक दिसते. कांजूर व देवनारमधील डम्पिंग ग्राऊन्डच्या दुर्गंधीमुळे पूर्व उपनगरातील मिठागरांचा परिसर आधीच अनारोग्याच्या खाईत ढकलला गेला आहे. या नव्या पुनर्वसनाचा अतिरिक्त भार पडल्यास पाणी, मलनिस्सारण, पर्जन्यवाहिन्या यांची यंत्रणा त्यास कशी पुरे पडणार? शहर नियोजनात सुसूत्रतेचा अभाव असल्याचे दिसून येत आहे.

# मासे आणि स्थलांतर

लोकनेता न्यूज नेटवर्क

सर्वसाधारणपणे मासे अन्न अथवा पुनरुत्पादनासाठी असे स्थलांतर करतात. क्वचित त्यांच्या स्थलांतराचे कारणदेखील अभ्यासकांच्या लक्षात येत नाही.अलीकडच्या काही वर्षांत भूजलशास्त्र, तापमान, पाऊसमान, बर्फाचे आच्छादन, समुद्राच्या पाण्याची पातळी, पाण्यातील क्षार या गोष्टी वातावरणबदल आणि जागतिक तापमानवाढ यामुळे झपाट्याने बदलत आहेत. या पार्श्वभूमीचा पाण्यातील अनेक जिवांवर परिणाम होतो. माशांचे स्थलांतर हा असाच एक विषय.माशांचे स्थलांतर म्हणजे माशांचे मोठ्या प्रमाणात एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे. अनेक प्रकारचे मासे नियमितपणे दर दिवशी, दर वर्षी अनेक किलोमीटर अंतरापर्यंत स्थलांतर करतात. स्थलांतर हे हवामान, उपलब्ध अन्नसाठा, शिकारीची भीती, पाण्याचा प्रवाह, पाण्याचे तापमान अशा अनेक घटकांवर अवलंबून असते. नैसर्गिक घटकांबरोबरच स्थलांतराच्या मार्गावरील नदीवर बांधलेली धरणे आणि मासेमारी हे घटक स्थलांतरासाठी नेहमीच धोक्याची ठरतात. स्थलांतर करणारे मासे आर्थिक, मनोरंजन आणि विहार या विषयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्वसाधारणपणे मासे अन्न अथवा पुनरुत्पादनासाठी असे स्थलांतर करतात. क्वचित त्यांच्या स्थलांतराचे कारणदेखील अभ्यासकांच्या लक्षात येत नाही.सामन (साल्मन) आणि स्ट्राइप्ड बास हे मासे सागरापगामी असतात, तर इल्स सरितापगामी असतात. बुल शार्क हा विविधक्षारसाही असून तो त्याच्या मर्जीनुसार गोड्या पाण्यातून खाऱ्या पाण्याकडे जातो. काही मासे ऊर्ध्व स्थलांतर करतात, तर टुना मासे तापमानानुसार उत्तरेला अथवा दक्षिणेला स्थलांतर करतात. सागरापगामी मासे अंडी घालण्यासाठी समुद्राच्या पाण्यातून गोड्या पाण्याकडे जातात; तर सरितापगामी मासे गोड्या पाण्यातून समुद्राकडे जातात. या स्थलांतरासाठी त्यांना आणि पिलांना अनेक गोष्टीत अनुकूलता निर्माण करावी लागते. माशांचे स्थलांतर हे कित्येक प्रजातींसाठी अस्तित्वाचा प्रश्न असतो.स्थलांतर करणारे मासे रोगवाहक म्हणून काम करतात; तसेच, ते अनेक महत्त्वाची पोषकतत्त्वे एका ठिकाणाहून दुसरीकडे नेतात. अर्थात, सागरी जीव-भारावर त्याचा परिणाम होतो. वातावरण बदलाचा प्रत्यक्षपणे जलपरिसंस्थेवर तसेच अप्रत्यक्षपणे माशांच्या स्थलांतरावर आणि त्यांच्या पुढील पिढीवर परिणाम होतो. त्याचा सखोल अभ्यास सध्या सुरू आहे.



# प्रभू श्रीराम मंदिर आणि भव्य सभा मंडप लोकार्पणाचा मनस्वी आनंद

## विद्यार्थ्यांनी अध्यात्मा बरोबरच गुणवत्ता क्षेत्रातही यशस्वी व्हावे-आ.सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

गेली पाचशे वर्षांपासून प्रभू श्री रामचंद्र जन्मभूमी मुक्तीचा लढा अखेर यशस्वी झाला असून अयोध्ये मध्ये प्रभू श्रीरामचंद्राचे भव्य दिव्य मंदिर निर्माण झाले आहे... पुंडी येथे देखील भव्य श्रीराम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून भव्य दिव्य सभा मंडप देखील पूर्ण होऊन आज रामनवमीच्या निमित्ताने लोकार्पण होत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे त्याचबरोबर पुंडी येथील विद्यार्थ्यांनी अध्यात्मा बरोबरच गुणवत्तेच्या क्षेत्रात देखील यश मिळवावे यासाठी सर्व सुविधायुक्त अभ्यासिका बांधकाम करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले पुंडी येथे श्रीराम मंदिर सभा मंडपाच्या लोकार्पण आणि रामनवमी निमित्त संगीत तुलसी रामायण कथा सांगता कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते

यावेळी तुलसी रामायण कथा प्रवक्ते रामायणाचार्य ह.भ.प.अमोल महाराज सातपुते,ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,विनोद रोडे,प्रवीण पोकळे,माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे आदी उपस्थित होते..





पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मुक्तीसाठी गेली पाचशे वर्षांपासून लढा सुरू होता आणि त्यामध्ये अनेकांनी आपले प्राण अर्पण केले. अखेरीस जन्मभूमी ठिकाणी रामलल्ला प्रभू श्रीराम प्रस्थापित झाले असून आयोध्या हे तीर्थक्षेत्र जागतिक मान्यता प्राप्त झाले आहे.

आष्टी,पाटोदा आणि पुंडी येथील श्रीराम मंदिर बांधकाम आणि भव्य दिव्य असा सभामंडप बांधकाम या कामांसाठी आपला अल्पसा सहभाग होता याबाबत आपण अत्यंत समाधानी आहोत.या श्रीराम मंदिराचे भूमिपूजन सभा मंडपाचे भूमिपूजन आणि लोकार्पणाला देखील आपणास उपस्थित रहाण्याची संधी मिळाली. अत्यंत कमी कालावधीमध्ये ही कामे पूर्ण झाली आहेत त्याबद्दल संपूर्ण ग्रामस्थांना धन्यवाद देत त्यांनी ग्रामस्थांच्या मागणीनुसार या श्रीराम मंदिराच्या परिसरामध्ये साहित्य ठेवण्यासाठी एक खोली आणि अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या सोयीसाठी एक खोली बांधकाम करण्यासाठी २५ लक्ष रु.निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले.तसेच पुंडीतील युवानेते बळीराम थोरवे यांनी अपेक्षा व्यक्त केल्याप्रमाणे या गावातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी दूरवरील नगर येथे जावे लागते त्यामुळे विद्यार्थिनींची गैरसोय होत असल्यामुळे पुंडी गावामध्ये स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांसह अद्ययावत अशी अभ्यासिकेचे बांधकाम करण्यात यावे अशी विनंती केल्यानंतर वातानुकूलते सह सर्व सोयींनी युक्त अशी अभ्यासिका बांधकाम करून देण्यात येईल असे आश्वासन आ. सुरेश धस यांनी दिले यावेळी प्रास्ताविक करताना पुंडी गावच्या सरपंच श्रीमती प्रतिभा बाळासाहेब थोरवे यांनी रामनवमी निमित्त तुलसी रामायण कथा सांगता सोहळा आणि सभा मंडप लोकार्पण सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले आणि आ.सुरेश धस यांनी विविध विकास कामांसाठी विकास निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब भिकू थोरवे, सरपंच श्रीमती प्रतिभा बाळासाहेब थोरवे, बाळासाहेब हरिश्चंद्र थोरवे, उपसरपंच सुनंदा बाळासाहेब थोरवे, सतीश दळवी, रमेश ढगे, संदीप जगदाळे, बळीराम थोरवे, बाळासाहेब राम वाडेकर, शिवाजी वाडेकर,सोन्या बापू नवसुपे,आप्पासाहेब भालेराव,दत्ता सुरवसे, आजिनाथ भालेराव,तुकाराम भालेराव, शांतीलाल भालेराव, संजय जाधव,शमशुद्दीन मोमीन,संजय काकडे,यांनी बहुमोल परिश्रम घेतले. या कार्यक्रमास पत्रकार शरद गर्जे,पत्रकार अविशांत कुमकर, युवा नेते अंभोरा गावचे सरपंच सागर आमले,रावसाहेब खाकाळ,ईश्वर मेटे,शिवाजी वाघमारे,भाऊसाहेब झांजे, सीताराम झांजे,संजय घोंगडे, राजेंद्र वाळके, पै.भाऊ झांजे, उद्योजक तान्हाजी अनभुले, प्रा. दादासाहेब झांजे, अण्णासाहेब आटोळे, बाळासाहेब मोरे, ह.भ. प.सुरेश उदमले,भरत भवर, रामदास डहाळे, बापूराव खोटे आदी उपस्थित होते.



**जिंतूर :- सेलू येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अरविंद निकाळजे यांनी अभिवादन केले. सेलू शहरातील अरविंद निकाळजे मित्रपरिवार च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महिंद्र साइंदे पाटील, कृष्णा बुरे ,हर्षल आंधळे ,अर्जुन गाडेकर हे उपस्थित होते.**

## रामनवमी निमित्त पालखी शोभा याञा व महाप्रसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

चारठाणा । श्रीपाद जोशी

हिंदू धर्मातील महान भगवान अयोध्या नगरीचा राजा श्रीराम प्रभू यांच्या( राम नवमी) जन्मोत्सवा निमित्त आज दि.१७ बुधवार रोजी येथील पेठ विभाग मेन रोडवरील ग्रामदैवत श्री संत जनार्दन महाराज मंदिर संस्थान व श्रीराम प्रभू मंदिर या ठिकाणी संत जनार्धन महाराज संस्थान अध्यक्ष डॉ.बालाप्रसाद शर्माजी

शर्मा व डॉ.महेंद्र शर्मा यानी सकाळी ९ते१२ पर्यंत श्रीराम प्रभु याच्या चरिञावर मार्गदर्शनानतर दुपारी १२वा.महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच येथील गोकुळेश्वर भगवान महादेव मंदीर संस्थान याठिकाहुन श्री राम नवमी जन्मोत्सव निमित्त टाळ,विणा,मृदंग हरिनामाच्या गजरात पालखी शोभायाञा काढण्यात आली,या शोभा याञेस येथील मार्गावर नाष्टा, चहापाण्याची व्यवस्था भाविकांकडून करण्यात आली या मिरवणुकीत राजकीय व सामाजिक नेते मंडळीसह, गोकुळेश्वर भगवान महादेव मंदीर



संस्थान भजनी मंडळी,सावता महाराज भजनी मंडळी,मारोती भजनी मंडळी,गणपती मंदिर भजनी मंडळी,बसवेश्वर महाराज भजनी मंडळी व परिसरातुन सर्व आलेले भजनी मंडळी व श्रीराम नवमी जन्मोत्सव समीती२०२४चे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांसह गावातील सर्व मीञ मंडळी व श्रीराम भाविक भक्त या शोभायात्रेत उपस्थित होते.

## हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेण्यासाठी आज शासकीय विश्रामगृहात बैठकीचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हिंगोली

१५-हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेण्यासाठी उद्या गुरुवार, दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता शासकीय विश्रामगृहात निवडणूक खर्च निरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत आयकर विभाग, वस्तु व सेवा कर, राज्य उत्पादन शुल्क तसेच बँकेचे, पोलीस विभागाचे व एमसीएमसी विभागाचे नोडल अधिकारी, हिंगोली, वसमत, कळमनुरी येथील सहायक खर्च निरीक्षक यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे.

या बैठकीस संबंधित अधिकाऱ्यांनी अद्ययावत माहितीसह वेळेवर उपस्थित राहावेत, असे आवाहन जिल्हा खर्च सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी यांनी केले आहे.

## देशात पं.मोदी नसते तर राम मंदीर झालेच नसते-खा विखे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कर्जत । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात राम मंदिराची उभारणी झाली, त्यांच्या हस्ते राम मंदिराचे भूमीपुजन झाले आणि प्राणप्रतिष्ठा सुद्धा त्यांच्याच हस्ते पार पडली. जर पंतप्रधान मोदी नसते तर देशाला राम मंदीराची अजूनही वाट पहावी लागली असती. मोदी नसते तर प्रभू रामचंद्राचे मंदिर झालेच नसते. असे मत अहिल्यानगरचे विद्यमान खासदार आणि महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले. रामनवमी निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

राम नवमीच्या निमित्ताने देशात प्रभू रामचंद्राचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. याच पार्श्वभुमीवर नगर जिल्ह्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गल्लोगल्लीत रामनामाचा जयकारा सुरू होता.



खा. डॉ. सजय विखे पाटील हे कर्जत तालुक्यातील भांभोरा येथे आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहून त्यांनी प्रभू रामचंद्राचे दर्शन घेऊन त्यांचे आशिर्वाद घेतले. यावेळी त्यांच्या सोबत आमदार राम शिंदे आणि इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रसंगी रामभक्तांना संबोधित करताना खा. विखे म्हणाले की, देशात राममंदिरासाठी ५०० वर्षांचा संघर्ष झाला. या संघर्षात अनेकांचे जीव गेले. मात्र केंद्रात मोदींच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेत आल्यानंतर राममंदिर पुर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला होता. यासाठी न्यायालयातील लढाई सरकारने यशस्वी केली. यामुळे अयोध्येत राम मंदिर उभे राहण्याचे स्वप्न पूर्णत्वास गेले. लोकसभा मतदार संघात मागील पाच वर्षात केलेल्या विकासकामांवर आपण नागरिकांकडे समर्थन मागत आहोत. या भागातील प्रश्नांसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून निधीची उपलब्धता केली. आपल्याकडे केलेली विकासकामे सांगण्याचे काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात घेतलेल्या निर्णयांचे लोककल्याणकारी योजनांची माहिती आहे. बुथवरील प्रत्येक कार्यकर्त्याने लाभार्थी आणि मदतारांपर्यंत पोहचवायची आहे. नकारात्मक गोष्टीना थारा देऊ नका असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. विरोधी उमेवाराकडे सांगण्यासाठी कोणतेही काम नाही, ते त्यांच्या तालूक्याचा विकास करू शकले नाहीत. लोकसभा मतदार संघाचा विकास कसा करणार? विश्वासघात करून त्यांचे राजकारण सुरू आहे. केवळ दहशत आणि दादागिरी करून सुरू असलेल्या राजकारणाला जनता कधीही स्विकारणार नाही. या भागातील जनता सुज्ञ आणि विचारी आहे. विकासाच्या कामावर शिक्कामोर्तब करून लोकसभा मतदार संघातील जनता महायुतीच्या पाठीशी खंबीर उभी राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





**भारतीय जनता पार्टी व शिवसेना महायुती चे उमेदवारखा सुजय विखे यांच्या प्रचारार्थ नगरमध्ये घर चलो अभियान चा शुभारंभ तारकपूर येथे करण्यात आला यावेळी महायुतीच्या सर्व घटक पक्षातील नेते कार्यकर्ते उपस्थित होते (फोटो-महेश कांबळे )**

## आदर्श मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा व भजन संध्या संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

शहरांमध्ये मध्ये संजय गेनाप्पा व मित्र परिवार तसेच आदर्श युवक मंडळ(ट्रस्ट)च्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर चौक,कोर्ट गल्ली मध्ये श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळचा सामुहिक हनुमान चालीसा पाठ संपन्न झाली व भजन संध्याने राम नामाने परिसर दुमदुमन गेला होता

हनुमान चालीसाच्या गायनाने कार्यक्रमात भक्तीचे रंग उधळले.तर नागरिकांनी सामुदायिक पठणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व भजन संध्यातभाविक तल्लीन झाले होते. हनुमान चालीसा गायन व विविध भजने सादर झाली.हनुमानाची हनुमानाची पूजा आरती सटवाजी व कलावती गेनप्पा या जेष्ठ दांपत्याच्या व डॉ विद्याधर पुंडे व डॉ विलासनी पुंडे या दांपत्याच्या हस्ते करण्यात आली

या कार्यक्रमास शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम,युवा नेते विक्रम राठोड,नगरसेवक संजय शेंडगे,दत्ता जाधव,सचिन शिंदे,श्याम नळकांडे,संतोष गेनप्पा,सुनील लालबोद्रे,रवी लालबोद्रे,प्रकाश भागानगरे,लंकेश हरबा,मोहिनीराज गटणे,रोहन धर्माधिकारी,संजय जाधव,सुरेश भागानगरे,बाळासाहेब बोराटे,दत्ता भागानगरे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व प्रभागातील हजारो नागरिक उपस्थित होते कार्यक्रमात हुबेहूब स्वामी समर्थ श्रीचंद माखिजा याने व बाल हनुमान हर्षद अणेंचा यांनी साकारले होते,ते इतके सुंदर दिसत होते कि प्रत्यक्ष समोर देव उभे आहेत असे वाटत होते ,संजय गेनप्पा म्हणाले गेली १७ वर्षे सततया ठिकाणी हनुमान चालीसा आम्ही आयोजित करत असून त्यामुळे भाविकांमध्ये व उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये आयुष्य जगण्यासाठी वेगळी ऊर्जा मिळते व अध्यात्माची गोडी लागते,युवक मंडळी यामुळे अध्यात्माकडे वळतात कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश इंदापूरकर,सचिन बोरा,अभिजीत देशमुख,दत्ता मिसाळ,राहुल ठाकूर,अभिजीत जैन,संजय कोरपे, अभिषेक शेटे,अतुल गायकवाड ,प्रसन्न कुलकर्णी,उमेश शीलवंत,अभिषेक जोशी सुरज जकाती,बाळकृष्ण केदारे,सोमनाथ चौधरी,सुरज गेनप्पा,विशाल गेनप्पा,सुजय गेनप्पा परिवाराने व आदर्श युवक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.आभार नगरसेविका सुवर्णाताई संजय गणपत यांनी मांडले हनुमान चालीसा कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली



## रामनवमी उत्सवाची २५० वर्षापासूनची परंपरा

# साठेगावात रामनवमी सोहळा; भाविकांची गर्दी उसळली










■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा | ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेडराजा तालुक्यातील जय जाणुबा महाराज यात्रोत्सव व रामनवमी २५०वर्षाची परंपरा अखंडितपणे पणे चालु आसून साठेगावात रामनवमी सोहळात भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे हा उत्सव गुढी पाडवा ते रामनवमी पर्यंत साठेगांव मध्ये दरवर्षी प्रमाणे सुरू असतो.यामध्ये श्रीराम कथासार ह.भ.प. भाटेपुरी महाराज आपल्या सुंदर वाणीतुन सात दिवस कथासार सांगतात. श्रवण सुखाचा आनंद घेण्यासाठी येथे गावातील अनेक भाविक हजर असतात. दरवर्षी अन्नदाते सातव्या दिवशी महाप्रसाद देत असतात . यंदाचे सातव्या दिवसाचे अन्न दाते श्री शिवाजी रोडुबा नागरे यांचा. मुलगा चि.देवानंद (पोलीस उपनिरीक्षक,) पदीनिवड झाल्याबद्दल दिला.रामनवमी शुभमुहूर्तावर रामजन्म झाल्यानंतर दरवर्षी नियमित महाप्रसादाचे देणारे श्री गणेश विठोबा नागरे (शुभम मेडिकल अंढेरा) यांच्याकडुन वाटप करण्यात येतो.सकाळी ४:०० वाजता जाणुबामहाराज यांची असंख्य भक्तांच्या उपस्थितीत महाआरती संपन्न झाली.त्यानंतर गावातुन शोभायात्रा दिंडी पताका जय घोषातुन मिरवणूक काढण्यात आली.४वाजेच्यानतंर बारागाड्याचा कार्यक्रम,रात्री ९:००वाजे पासुन पारंपरिक सोंगाचा कार्यक्रम व तमाशा लोककला कार्यक्रम होत असतो. दुसर्या दिवशी पारंपरिक आईचं सोंग लग्न व त्यानंतर भव्य कुस्त्यांचे दंगल होत असते. या रामनवमी सोहळ्यात गावातील बाहेर गावी असलेल्या सर्व गावकरी व नातेवाईक तसेच जिल्ह्यातील श्रध्दांळू मोठ्या संख्येने हजर राहतात या रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर समस्त गावकऱ्यांच्या उपस्थित राममंदिराचे भुमीपुजन करण्यात आले आहे रामनवमी निमित्त संपूर्ण गावांमध्ये सर्व रस्त्यांवर रांगोळी काढण्यात आली असून जानोबा मंदीरासमोर रामाची रांगोळी आकर्षक चा विषय ठरला आहे रामनवमी सोहळ्यात गावं व तालुक्यातील बहुतांश नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात

# लिंबागणेश येथे राष्ट्रसंत कैकाडी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.१७ एप्रिल बुधवार रोजी राष्ट्रसंत श्री राजाराम महाराज ऊर्फ कैकाडी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, ग्रामपंचायत सदस्य रमेश गायकवाड, श्रीहरी निर्मळ,दामु थोरात, महादेव कुदळे, अर्जुन घोलप, जिवन मुळे, सुखदेव वाणी, दादा गायकवाड, सुरेश निर्मळ, अँड.गणेश वाणी, रामचंद्र मुळे, सय्यद बशीर, औदुंबर नाईकवाडे, तुकाराम गायकवाड, संतोष भोसले, तुळशीराम पवार, विकास गायकवाड, अंकुश गायकवाड, बाबासाहेब गायकवाड,शिवराम गायकवाड, परशूराम गायकवाड,प्रेम गायकवाड, कैलास गायकवाड,विजेश गायकवाड, राहुल गायकवाड,आनिल गायकवाड, सतिश गायकवाड आदी ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सुत्रसंचलन लेहनाजी गायकवाड यांनी तर आभारप्रदर्शन दादा गायकवाड यांनी केले. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या कार्याची महती विशद करताना रमेश गायकवाड यांनी कैकाडी बाबांनी किर्तने, प्रवचने, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाहास प्रतिबंध, अस्पृश्यता निर्मूलन याबाबत किर्तन,प्रवचनाद्वारे समाज प्रबोधन केले.पंढरपुर येथे भाविकांकडून सहस्र कोटी नामजप करवुन घेतला.पंढरपुर तिर्थक्षेत्री कैकाडी मठाची निर्मिती करुन संपूर्ण जगाला एकात्मतेची शिकवण दिली.या मंदिरामध्ये आजतागायत अखंड रोज गोरगरीबांना अन्नदान आणि वस्त्रदान सुरू असल्याचे प्रतिपादन केले,

# रामनवमी निर्मित मलकापूर झाले भक्तिमय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

श्री रामाच्या गजराने दुम दुमली मलकापूर नगरी ढोल, ताशे, डिजे बेंड चे तालावर वाजत गाजत नाचत निघाली श्री रामाची भव्य मिरवणूक.मलकापूर शहरा मध्ये राम नवमी निमित्त अनेक ठिकाणी उत्सव व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले

मलकापूर जुने गाव मधील बालाजी मंदिर मधील श्री राम लक्ष्मण सीता ,हनुमान ची आरती करून मलकापूर शहरातील मुख्य चौकातून वाजत गाजत मिरवणूक सायंकाळी ५वाजता काढण्यात आली या मिरवणुकीत महिला,पुरुष ,वयस्कर वृध्द सर्वांनी सहभाग घेतला तसेच या कार्यक्रमात श्री राम व सीता माता वेश भूषेत रथा मध्ये बसूउन मिरवणूक काढताना मलकापूर शहरातील नागरिकांनी श्री रामाच्या जय घोशाने मलकापूर नागरी दुम दूमली या कार्यक्रमात राजकीय नेते सामाजिक कार्यकर्ता,शासकीय अधिकारी यांनी हजेरी लावली



**अयोध्या मध्ये श्री रामाचे मंदिर झाल्यामुळे मलकापूरच नव्हे तर संपूर्ण भारतात श्री राम नवमी उत्सव या वेळी अती जल्लोषात साजरा होत आहे .मा.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या मुळे श्री रामाच्या जन्मभूमी येथे राम मदिर बनवल्यामुळे जनतेमध्ये श्री राम नवमी चां उत्सव हर्ष उल्लहासाने आम्ही सर्वजण साजरा करत आहोत असे प्रतिपादन माझी आमदार चैनसुख संचेती यांनी दिले**





**प्रभू श्रीराम नवमी निमित्त गावामधून प्रदक्षिणा घालण्यात आला दूरजनांचा नाश करून कुशल प्रशासनाचा आदर्श प्रस्थापित करणारे मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र यांना वंदन यावेळी चिमुकल्यांनी वेगवेगळी पात्र घेऊन गावकऱ्यांचे मने जिंकले गावातील महिला मंडळ पुरुष मंडळ मोठे संख्येने उपस्थित होते.. छाया लोकनेता न्यूज नेटवर्क**

# शहरात अवैध रेती वाहतूने घेतला युवकाचा बळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**






रस्त्यावर शहरातून सुसाट वेगाने जाणाऱ्या अवैधरीत्या रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने स्टेट बँके समोर अंदाजे २२ वर्षीय तरुणाला धडक दिल्यानेत्याचा जागीच मृत्यूझाल्याची दूर्देवी घटना दि, १६ एप्रील रोजी रात्री ८ वाजेदरम्यान घडली. तहसीलदार गिरीष जोशी यांनी सदर टिप्परचा पाठलाग करुन टिप्पर मेहकर पोलीस स्टेशणला लावले.असुन टिपर चालक वरती रात्री कलम २७९, ३४अ, भादवी सह कलम १८४, १३४मोहकलम दाखल करण्यात आले असून, रात्री उशिरा पर्यंत कारवाई चालू असून घटनेची माहिती मिळताच एस.डी.पी.ओ.प्रदीप पाटील लोणार पोलिस स्टेशन चे पोलिस निरक्षण निमिष मेहेत्रे सहायक पोलिस निरीक्षक राजाभाऊ घोगरे ,संतोष चव्हाण, गोपनीय विभागचे संतोष चव्हाण गजानन सानप, इतर पोलिस उपस्थीत असून पुढील तपास संतोष चव्हाण,पो ह निकष,सविस्तर वृत्त असे की मराठवाड्यातील तळणी परीसारातील पुर्णा नदीपात्रातून अवैधरीत्या रेती वाहतूक मोठ्या प्रमाणात राजेरोसपणे सूरु आहे. दि. १६ एप्रील रोजी ही अवैधरीत्या रेती वाहतूक कराणार्या एम.एच. २२ बिएच ४९४८ टिप्परने मृतक ज्ञानेश्वर आदीनाथ पवार वय अंदाजे २१ हा आपल्या शारा या मुळगावी पैदल जात असताना सूसाट वेगाने येणाऱ्या टिप्परने त्याला जबर धडक दिली. घटनास्थळावर डोक्याचा मेंदू बाहेर पडल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव उडवीणारी झाला. ही थरकाप घटना पहाताच घटनास्थळावर नागरीक संतप्त झाले होते. विशेष म्हणजे ही घटना पाहिली नसुन या अवैध रेती वाहतुक करणाऱ्या वाहनाने एका महीण्यात निष्पाप बळी जाणारी ही दूसरी घटना असल्याने अधीकारी यांच्या हप्तेखाऊ धोरणामुळे शहरातील नागरीकांचे निष्पाप बळी जात असल्याची चर्चा नागरींक घटनास्थळावर करताना दिसून येत होते. विशेष म्हणजे विना नंबर रेती वाहने वाहातूक करीत असताना आरटिओ अधीकारी वाहतूक पोलीस यांनी आपल्या डोळ्यावर धूतराष्ट्रासाराखी काळी पट्टी बांधल्याचे निर्देशणास येत आहे. जिल्हाधीकारी, एसडीओ यांचेही याकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष होताना दिसून येत आहे. तरी वरीष्ट स्तरावरुन लक्ष घालून रेती माफीयाला पायबंध घालण्याची मागणी नागरीक करीत आहे.

# निवडणुकीत मतासाठी दारू आणि पैसे देणाऱ्या उमेदवाराला जनतेनी मते देवु नका अविनाश पाटील यांचे अवाहण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा | ज्ञानेश्वर बुधवत**

निवडणुकीत मतासाठी दारू आणि पैसे देणाऱ्या उमेदवाराला जनतेनी मते देवु नका असे अवाहण महाराष्ट्र अंधश्रद्धा निमृलण समितीचे राज्याचे अध्यक्ष तथा व्यसण मुक्त महाराष्ट्र समन्वय मंच राज्यनिमंत्रक आविनाश पाटील यांनी ता .१६ रोजी देऊळगाव मही येथे केले . ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीच्या निमीत्ताने लोकसभा निवडणुकीच्या पार्शभुमीवर विदर्भ दौरावर आले होते .या दौऱ्यात मध्यप्रदेश मधील शिवणी जिल्हासह नागपुर , आमरावती , बुलडाणा येथे कार्यक्रत्याच्या भेटी घेतल्या . यावेळी त्यांच्या सोबत राज्यसरचिटणीस संजय शेंडे , मनोहर धंदर , गौरव आळणे , प्रदीप हिवाळे आदी सोबत होते .

निवडणुकीच्या काळात लोकांना दारूच्या नशेत ठेवून त्यांची मती गुंग करून त्यांच्याकडून मते मिळविली जातात.अनेकांना निवडणूक प्रचार काळात दारूचे व्यसन लागते आणि ते अकाली मृत्यू येईपर्यन्त पोहचते. व्यसनाजन्य पदार्थाच्या विक्रीतून सरकारांना मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.तसेच व्यसनाजन्य पदार्थांची निर्मिती, वितरण आणि विक्रीवर सरकारचे नियंत्रण नाही.कायदे नियम तोडून व्यसनांचा विळखा दिवसेंदिवस वाढत आहे.आरोग्यांचे प्रश्न, कौटुंबिक कलह, शोषण, गुन्हेगारी,अपघात, भ्रष्टाचार आणि बेकायदेशीर बाबी व्यसनातून निर्माण होत आहेत.व्यसन हे विवेक विरोधी असून समाजाचे आणि



देशाचे स्वास्थ बिघडविणारे आहे.त्यामुळे व्यसनविरोधी प्रचार, प्रसार, प्रबोधन,कायदा, निती, धोरण, समुपदेशन व उपचार केंद्रांची आवश्यकता आहे.त्यासाठी राजकीय पक्ष,उमेदवार,नेते यांनी भूमिका घेऊन कृती करण्याची गरज आहे.देशात सुरु असलेल्या लोकसभा निवडणुक प्रक्रियेत व्यसन विरोधी भूमिका घेण्याचे आवाहन राजकीय पक्ष व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना आम्ही व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचच्या वतीने करत आहोत. व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचात सहभागी असलेल्या संघटना, संस्था, गट, व्यक्ती यांच्या वतीने राजकीय पक्ष, उमेदवार, नेते व पदाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे . निवडणूक प्रचारात व्यसनाजन्य पदार्थांचे वाटप, वितरण करू नये. निवडणुकोत्तर काळात व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करावेत. देश पातळीवर कठोर व्यसनमुक्ती धोरण आणण्यासाठी प्रयत्न करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. ज्या राज्याने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले आहे, अशा राज्यांसाठी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. व्यसनांपासून सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नापासून व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी केंद्र सरकारने किमान ५% रकमेची तरतूद करावी. प्रत्येक जिल्ह्याला १००बेडचे एक सरकारी व्यसनमुक्ती उपचार केंद्र असायला हवे. शैक्षणिक अभ्यासक्रमात व्यसनमुक्ती हा विषय असावा. प्रत्येक तालुक्यात व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्र असणे गरजेचे आहे. दारूबंदी अधिनियममध्ये बदल करण्यासाठी नागरिकांकडून जन सुनावणीच्या माध्यमातून सूचना मागवाव्यात.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904